सकाळ

सप्टेंबर २०२२ । किंमत ५० रुपये

# MONEY



खरा
श्रीमंत कोण?



शेअर बाजार :
तेजीच्या
पाऊलखुणा?



राकेश मरा नहीं,
राकेश मरते नहीं!



## श्रीगणेशा गुंतवणुकीचा



स्वप्नपूर्तीचे
नऊ दिवस

गृहकर्जमुक्त
कसे व्हाल?




'मिशन डॉ. शास्त्री,
रु. ५० कोटी!'



# अर्थचातुर्याचा खळाळता झरा!



डॉ. प्रमोद चौधरी

राकेश झुनझुनवाला यांच्याशी माझा दोन दशकांहून अधिक काळ प्रत्यक्ष संपर्क होता. व्यक्तिगत स्तरावर ते माझे मित्र होते आणि प्राज इंडस्ट्रीजचे काही कालावधीसाठी संचालक म्हणूनही त्यांनी काम केले. त्यांच्या अकाली निधनाने प्राज परिवारात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ती दीर्घकाळ भरून येऊ शकणार नाही.

या शतकाच्या सुरवातीला आमची पहिली भेट झाली. जैवअर्थव्यवस्थेमध्ये आपल्या देशाच्या विकासाची क्षमता कशी आहे आणि त्यामध्ये 'प्राज'ला किती संधी आहेत, यावर आमची सखोल चर्चा झाली होती. अशा आणखी काही बैठका झाल्यानंतर, औद्योगिक जैवतंत्रज्ञानाच्या क्षेत्रात 'प्राज'चे वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे, याची त्यांना खात्री पटली आणि त्यांनी 'प्राज'मध्ये गुंतवणूक केली. कमी भांडवल असणाऱ्या, परंतु वाढीची क्षमता असणाऱ्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करून त्यांना मोठ्या भांडवलाच्या कंपन्या करण्यात झुनझुनवाला यांना अधिक रस होता. 'प्राज'च्या संचालकपदी असताना कंपनीच्या वाढीमध्ये त्यांचा मोलाचा वाटा होता. त्यांचे अर्थचातुर्य अचाट होते आणि अर्थकारणाची जाणही सखोल होती. त्याचा लाभ आम्हाला झाला. टाकाऊ शेतमालापासून इथेनॉलनिर्मितीच्या महत्त्वाकांक्षी प्रयोगात आम्ही यशस्वी ठरण्यास त्यांचा हातभार लागला. 'प्राज'च्या नेतृत्वाचे मार्गदर्शक आणि सदुपदेशक म्हणून मी राकेश झुनझुनवाला यांचा उल्लेख करेन. आर्थिक अस्थिरतेच्या वातावरणात वित्तीय बाजारपेठांविषयीचा आपला अभ्यास आणि समज यांचे भांडार दुसऱ्यांपुढे खुले करण्यास ते सदैव तत्पर असत. 'प्राज' कंपनीच्या औपचारिक आणि अनौपचारिक अशा दोन्ही स्वरूपाच्या कार्यक्रमांमध्ये चैतन्य आणि सकारात्मकता आणणारे असे हे व्यक्तिमत्त्व होते.

राकेश हे आधुनिक तंत्रज्ञानाचे खंदे पुरस्कर्ते होते. या वर्षाच्या सुरवातीस झालेल्या आमच्या चर्चेनुसार 'प्राज' विकसित करत असलेल्या Sustainable Aviation Fuel या हरित इंधनामध्ये त्यांना रस होता. त्यांनी नुकत्याच सुरु केलेल्या अकासा एअरलाईन्सच्या विमानांमध्ये Sustainable Aviation Fuel चा वापर करून हवाई क्षेत्रातील कर्बोत्सर्जन कमी करण्यास ते उत्सुक होते. दुसऱ्या पिढीच्या (२जी) इथेनॉलची निर्मिती यशस्वी होईल, हे राकेश यांनी काळाच्या आधीच ओळखले होते. इंडियन ऑइल कंपनीने पानिपतमध्ये उभारलेल्या देशातील पहिल्या २जी इथेनॉल जैवइंधन प्रकल्पाचे उदघाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नुकतेच होऊन 'प्राज' आता या क्षेत्रातील व्यावसायिक उड्डाण घेण्याच्या उंबरठ्यावर आहे. जी कल्पना राकेश यांनी उचलून धरली, ती प्रत्यक्षात येताना पाहण्याचे भाग्य राकेश यांच्या नशिबी नव्हते, हे दुर्दैव.

एक देशप्रेमी आणि आपल्या शब्दाला जागणारा माणूस म्हणून राकेश यांच्याविषयीच्या अनेक आठवणी माझ्या मनात दाटून येतात. अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान क्षेत्रात भारतामध्ये अफाट क्षमता आहे, याविषयी आमचे एकमत होते. त्या क्षमतांचे प्रत्यक्ष संधींत कसे रूपांतर होईल, यावर आमच्या चर्चा होत. भारत ही विकसित अर्थव्यवस्था होणार, याविषयी निःसंदिग्ध दृढ भावना असणारा असा हा माणूस होता. भांडवली बाजारात उतरू पाहणाऱ्या कोणीही आदर्श म्हणून पाहावे, असा गुंतवणूकदार होता. भारतात गुंतवणूक करणार असाल तर तुम्हाला अमर्याद संधी आहेत, असे ते म्हणत. त्या संधी दाखवणारे म्हणून त्यांची आठवण सर्व जण नेहमीच काढत राहतील.

आज मात्र आम्हाला त्यांची उणीव भासत आहे. समाधानाची बाब एवढीच, की त्यांनी दिलेली दृष्टी आम्हाला यापुढील वाटचालीतही साथ देत राहील.



राकेश झुनझुनवाला

(लेखक प्राज इंडस्ट्रीजचे संस्थापक-कार्याध्यक्ष आहेत.)